चंद्रपूर जिल्हा पोलीस
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२९ एप्रिल, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)

# स्वत:च्या मुलांवर गोळया झाळुन वडिलाने केली आत्महत्या

दिनांक २८/०४/२०२० रोजी फिर्यादी नामे पवन मुलचंद द्विवेदी रा. सुभाष वार्ड बल्लारशाह यांनी पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे रिपोर्ट दिली की, त्याचे वडिलाने पवन आणि त्याचा भाउ आकाश याचेवर रिव्हाल्वरने राहत्या घरात गोळया झाळल्या आणि स्वत: गोळी झाळुन आत्महत्या केली. यावरून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. ३४३/२०२० कलम ३०२,३०७ भादंवि सहकलम ३,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

आतापर्यंत केलेल्या पोलीस तपासादरम्यान अशी माहिती मिळाली की, स्वत:चे मुलांवर गोळी झाळणारे मुलचंद द्विवेदी हे नागपूर येथे नोकरी करीत होते. काही दिवसांपासुन ते स्वत:च्या घरी बल्लारशाह येथे राहावयास आले होते. त्यांची मानसीक परिस्थिती बरोबर नसल्याने त्यांचा नागपुर येथे उपचार सुरू होता. दिनांक २८/०४/२०२० रोजी संध्याकाळी ०५ वाजता दरम्यान मुलचंद द्विवेदी हे त्यांचे दोन मुलं पवन आणि आकाश यांचेसह घरी हजर असतांना मुलचंद द्विवेदी यांनी त्यांचे घरी असलेल्या रिव्हाल्वरमधुन सुरवातीस मुलगा पवन यांचेवर गोळी झाडली त्यामुळे पवन याचे हाताला गोळी लागल्याने तो गंभीर जखमी झाला. आवाज ऐकुन दुसरा मुलगा आकाश हा धावत आला तर मुलचंद द्विवेदी यांनी आकाशवर सुध्दा गोळी झाळली त्यामुळे तो जागीच कोसळुन मरण पावला. यानंतर मुलचंद द्विवेदी यांनी आपल्या रूम मध्ये जावुन स्वत:वर गोळी झाळुन आत्महत्या केली. सदर घटनेमध्ये मुलगा पवन हा गंभीर जखमी असुन त्याचेवर उपचार सुर आहे. सदर घटनेची माहिती होताच पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी, अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा श्री. स्वप्निल जाधव यांनी घटनास्थळी भेट देवुन तपासाबाबत बल्लारशाह पोलीसांना योग्य त्या सुचना दिल्या. पुढिल तपास बल्लारशाह पोलीस करीत आहे.

---

# चंद्रपूर जिल्हा पोलीस

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२९ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)


# बल्लारशाह पोलीसांकडुन मोटारसायकल चोरास अटक

## आरोपीकडुन ४ मोटारसायकल जप्त

दिनांक २२/०४/२०२० रोजी फिर्यादी अरूण निर्मल मंडल रा. अष्टभुजा वार्ड चंद्रपुर यांनी पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे रिपोर्ट दिली की, ते बल्लारशाह येथे काही कामानिमित्य गेले असता त्यांचे दुचाकी हिरो पॅशन प्रो क्र. एम एच ३४ बीई ४०३८ किं. ५०,०००/—रू. कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेली. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. ३३६/२०२० कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच सदरचा गुन्हा गुन्हे शोध पथकाकडे सोपाविण्यात आला. गुन्हे शोध पथकाने आपली तपास चक्रे फिरवित गोपनीय माहिती काढण्यास सुरूवात केली. दरम्यान माहिती मिळाली की, दुचाकी चोरी करणारा इसम हा पोस्टे बल्लारशाह हद्दीतील कळमना येथील असुन तो सद्या आपल्या घरी हजर आहे. यावरून तपास पथकाने आरोपी नामे नितिन नथ्थु मारबते वय १९ रा. कळमना बल्लारशाह यास मोठया शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीस वरील गुन्हयाबाबत गुन्हे शोध पथकाने तपास कौशल्य वापरून विचारपुस केली असता, त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने आरोपीकडुन गुन्हयातील हिरो पॅशन प्रो क्र. एम एच ३४ बीई ४०३८ जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपीची आणखी इतर गुन्हयाबाबत कसुन चौकशी केली असता त्यांने यापुर्वी सुध्दा चोरी केलेल्या तिन दुचाकी १) होंडा एविएटर किं. ३०,०००/—रू, २) होंडा शाईन किं. ३०,०००/—रू, ३) हिरो होंडा स्प्लेंडर किं. १०,०००/—रू त्याचे कडनु जप्त करण्यात आल्या असुन सदर गुन्हयात एकुण ४ दुचाकी किं. १,२०,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीचा पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आला आहे. पुढिल तपास बल्लारशाह पोलीस करीत आहे. लॉकडाउनच्या काळात इतर कामाचा ताण असतांनाही पोलीसांनी सदर गुन्हे उघडकीस आणुन केलेली कामगीरी कौतुकास्पद आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा श्री. स्वप्नील जाधव यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक बल्लारशाह श्री. भगत यांचे नेतृत्वात सपोनि श्री. विकास गायकवाड, पोहवा सुनिल कांबळे, पोना सुधाकर वरघणे, पोना. संतोष दंडेवार, पोशि. शरद कुडे, चंद्रशेखर माथनकर, अजय हेडाउ, स्वप्निल देरकर, श्रीनिवास वाभिटकर, मपोशि. सिमा पोरेते यांनी महत्वाची भुमिका बजावली.

---

# चंद्रपूर जिल्हा पोलीस

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२९ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)


# पोलीस विभागाकडुन माल वाहतुकदारांना महत्वाच्या सुचना

## पोलीस अधीक्षक यांनी घेतली ट्रांस्पोर्टर यांची बैठक

दिनांक २९ एप्रिल २०२० रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय चंद्रपुर येथे डॉ. महेश्वर रेडड्ी पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे अध्यक्षतेखाली लॉकडाउन दरम्यान चंद्रपुर जिल्हयात अत्यावश्यक सेवेकरीता वापरण्यात येणारे ट्रक व माल वाहु वाहनांच्या संबंधीत वाहन मालकांची/ट्रांस्पोर्टर्र्सची (सोशल डिस्टिंसिंगचे नियम पाळुन) बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अत्यावश्यक सेवा देतांना घ्यावयाची काळजी/ दक्षता बाबत चर्चा करण्यात येवून ट्रांस्पोर्टर्र्स यांना खालील सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

- रेड झोन/ ऑरेंज झोन मधुन जाणारे वाहन चालकांनी आपले वाहन कोठेही थांबवू नये
- वाहन चालकांनी चंद्रपूर मध्ये येतांना आपल्या नातेवाईक/मित्र यांना बाहेर गावांतुन आणणार नाहीत.
- वाहन चालकांनी आपल्या रिकाम्या वाहनांतून लोकांची वाहतुक करु नये. तसेच वाहन चालक हे इतर जिल्हयातुन आल्यानंतर त्यांनी इतर कोठेही बाहेर न फिरता आपल्या घरातच राहतील याची खबरदारी घ्यावी.
- वाहन मालकांनी आपल्या वाहनातून चंद्रपूर जिल्हयात बाहेर जिल्हयातील/राज्यातील कोणीही नागरीक येणार नाही याची दक्षता घ्यावी.
- ट्रॉन्सपोर्टर यांनी त्यांचे अधिनस्त असलेले वाहन चालकाचे संपुर्ण नांव, पत्ता, मोबाईल क्रमांक तात्काळ संबंधीत पोलीस स्टेशन येथे दयावे.
- ट्रॉन्सपोर्टर यांनी त्यांचे अधिनस्त असलेले वाहन चालकाला कोणत्याही प्रकारच्या आजाराचे लक्षण असल्यास, त्यांना तात्काळ मेडिकल उपचाराकरीता पाठवावे.
- वाहन चालकाने प्रवासा दरम्यान सोशल डिस्टन्सींगचे तंतोतंत पालन करणे, तसेच वाहनात वाहन चालक व वाहक यांचेसाठी हॅण्ड सॅनिटायझर, हॅण्ड वॉश, वॉटर बॉटल, जेवणाचे साहित्य ईत्यादि ची व्यवस्था ठेवावी.
- वाहन मालकाने आपल्या कार्यालयात **Temperature Screening Machine** ठेवावे.
- वाहन मालकाने वाहन चालक प्रवास करण्याअगोदर त्याचे वैद्यकीय तपासणी करवून घ्यावी.

यांप्रमाणे सुचना ट्रॉन्सपोटर्स यांना पोलीस विभागातर्फे देण्यात आल्या. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी, अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे, यांनी सदर बैठकीला मार्गदर्शन केले.सदर बैठकमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. शिलवंत नांदेडकर यांचे सह ४० ते ४५ ट्रांस्पोर्टर्र्स उपस्थित होते.

———————————————————————————————

चंद्रपूर जिल्हा पोलीस
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२९ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)

## ब्रम्हपुरी पोलीसांची मोहा हातभट्टी चालविणाऱ्याविरूध्द कार्यवाही

### १ लक्ष ३१ हजार ५५० रू चा मोहा सडवा नष्ट

दिनांक २८/०४/२०२० रोजी पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, मौजा चोरटी गावाजवळील शेतशिवारात तीन ठिकाणी मोहा हातभट्टया लावुन काही इसम मोहा सडवा दारू तयार करीत आहे. अशा माहितीवरून पोलीस पथकाने मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी छापा टाकला असता, सदर तिनही ठिकाणाहुन मोहा सडवा ११५० किलो. किं. १,१५,०००/—रू आणि इतर साहीत्य किं. १३,५५०/—रू असा एकुण १,३१,५५०/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे नोंद करण्यात आला असुन एकुण ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी पोनि श्री. मकेश्वर यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी पार पाडली.

---